आर.सी.सी क्र.५९९/२०१८
सरकार विरुध्द आयुष जैन
**निशाणी क्र. ४०/ क**

**अभियोग पक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक–१ यांची जबानी–**
मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,
**माझे नाव – श्री. चंपालाल जसारामजी घांची,**
वय – ४५ वर्षे, व्यवसाय – भांड्याची दुकान,
निवासस्थान– दिवाणी देवडी, गुलमंडी, छ.संभाजीनगर.

---

**सरतपासणी अभियोग पक्षा करीता**
**विद्वान श्रीमती. एम. एस. राऊत, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे द्वारा –**

**१.** दिनांक २०.१०.२०१७ रोजी पोलीसांनी मला पंच म्हणून पंचनामा करण्यासाठी बोलाविले नाही. पोलीसांनी माझी जप्ती पंचनाम्यावर सही घेतली. मला पंचनामा दाखविला. या पंचनाम्यावर अनुक्रमांक–२ वर सही आहे. माझ्या समक्ष पंचनामा झाला नाही. या पंचनाम्यावरील मजकुर मला माहीती नाही. पंचनाम्यावरील सहीला **निशाणी क्रमांक ४१** देण्यात येत आहे.

**साक्षीदार अभियोग पक्षाला मदत करीत नाही, त्यामुळे सहाय्यक सरकारी वकील यांनी विनंतीवरून उलट तपासाचे स्वरुपात सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी दिली.**

**२.** हे म्हणने खरे नाही की, दिनांक २०.१०.२०१७ रोजी पोलीस ठाणे सिटीचौक येथे बोलाविले होते. मी श्री. संदीप जैन यांना ओळखतो. कारण त्यांचे दुकान माझ्या दुकानाशेजारी आहे. हे म्हणने खरे आहे की, त्यांचे व माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणने खरे आहे की, माझ्या सोबत दुसरे पंच श्री. जितेंद्र हे ही माझ्या सोबत होते. हे म्हणने खरे आहे की, मी सिटीचौक पोलीस ठाण्यात भांडण झाल्यावर गेलो होतो व पोलीस ठाण्यात मी सही केली होती. हे मला आठवत नाही की, माझ्या समक्ष संदीप जैन यांनी सही केली होती. हे म्हणने खरे आहे की, संदीप जैन हे देखील पोलीस ठाण्यात त्यावेळेला आले होते. हे म्हणने खरे नाही की, संदीप जैन यांच्याकडुन माझ्या समक्ष एक किचैन व दिड इंचाचा छोटा चाकू जप्त केला होता. हे म्हणने खरे नाही की, त्या चाकूने इजा करण्यात आली होती व माझ्या समक्ष पंचनाम्याने जप्त केला होता.

३. माझे शिक्षण इयत्ता दहावी पर्यंत झाले आहे. हे म्हणने खरे आहे की, मी को–या कागदावर सही करीत नाही. हे म्हणने खरे आहे की, लिहलेला कागद वाचल्याशिवाय मी सही करीत नाही. हे म्हणने खरे नाही की, माझ्या समक्षच जप्ती पंचनामा झाली त्यामुळेच मी पंचनाम्यावर सही केली. हे म्हणने खरे नाही की, संदीप सोबत माझे चांगले संबंध असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

आर.सी.सी क्र.५९९/२०१८
**सरकार विरुध्द आयुष जैन**
**निशाणी क्र. ४०/ क**

**<u>उलटतपासणी आरोपी पक्षा करीता विद्वान श्री. एस. एस. खिवंसरा, विधीज्ञ यांचे द्वारा– यांनी उलटतपास नाकारला.</u>**

**<u>फेरतपास– काही नाही.</u>**

समक्ष
**–/स्वाक्षरीत/–**
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
दिनांक– २०/११/२०२५.

श्रवणोत्तर स्वीकृती.
**–/स्वाक्षरीत/–**
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद